राज्यातील विजाभज प्रवर्गाच्या १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांची मान्यता कायम करण्यासाठी प्रस्तावाची तपासणी करण्याकरिता समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,
शासन निर्णय क्र. विभशा -२०१८/ प्र.क्र.७१/ विजाभज-२
मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.
दिनांक - २८ मार्च, २०१८

<u>वाचा</u> :- १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विभशा - २००६ /प्र.क्र.५९/मावक -६, दि. २६/०६/२००८ व दि. ०९/०९/२००८.
२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विभशा - २००६/प्र.क्र.५९/मावक -६, दि. ३१/०८/२००९.

<u>प्रस्तावना</u> :-

राज्य शासनाने राज्यातील माध्यमिक आश्रमशाळांना जोडून १४८नविन उच्च माध्यमिक आश्रमशाळा सुरु करण्यास संदर्भाधिन शासन निर्णयान्वये परवानगी दिलेली आहे. सदरहू उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विहित मुदतीत वेतन अनुदान न मिळल्यामुळे सदरहू कर्मचाऱ्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई आणि नागपूर व औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केल्या. सदरहू याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालयाने सदरहू कर्मचाऱ्यांना प्रथमत: ५० % थकबाकीची रक्कम व नंतर १००% नियमित वेतन अदा करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सदरहू उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सदरहू उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या तपासणीच्या अधिन राहून वेतन अनुदान अदा करण्यात येत आहे. त्यानुसार राज्यातील १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांची तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश संचालनालयास देण्यात आले होते. त्याअनुषंगाने उच्च माध्यमिक आश्रमशाळांचा तपासणी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. परंतू, सदरहू उच्च माध्यमिक आश्रमशाळांची तपासणी संदर्भाधिन दि. २६/०६/२००८च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार व याप्रकरणी वित्त विभागाने दिलेल्या निर्देशानुसार आहे किंवा नाही. याबाबतची तपासणी काही आवश्यक आहे. त्यामुळे सदरहू १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांची प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी शासन स्तरावर समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

राज्यातील शासनमान्य खाजगी शैक्षणिक संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या उच्च माध्यमिक आश्रमशाळांची तपासणी संदर्भाधिन दि. २६/०६/२००८ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार व याप्रकरणी वित्त विभागाने दिलेल्या निर्देशानुसार सदरहू १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांची प्रस्तावाची सखोल तपासणी करण्यासाठी शासन स्तरावर खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	कार्यालयाचे नाव	पद
	श्री. भा. र.गावित, सह सचिव	विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई	अध्यक्ष
	श्री. सु.अ.पेडगांवकर, अवर सचिव	विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई	सदस्य
	श्री. भिमराव खंडाते, उप संचालक	विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,पुणे	सदस्य
	श्रीमती शोभा कुलकर्णी,सहायक संचालक	विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,पुणे	सदस्य
	श्री. पी.एम.परदेशी, सहायक संचालक	विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,पुणे	सदस्य
	श्री. कि.आ.फुलझेले, कक्ष अधिकारी	विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय,मुंबई	सदस्य-सचिव

सदरहू समितीने खालील मुद्यांच्या अनुषंगाने राज्यातील १४८ उच्च माध्यमिक आश्रमशाळांची सखोल तपासणी करुन आपला अहवाल शासनास ३० दिवसात सादर करावा. उच्च माध्यमिक आश्रमशाळांच्या प्रस्तावांची तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासंदर्भातील कार्यपध्दती सदरहू समितीने ठरवावी. मात्र, कोणत्याही परिस्थितीत समितीने आपला सविस्तर अहवाल आश्रमशाळा निहाय शिफारशीसह शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०४०२१३०६३७३१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.04.02 13:07:51 +05'30'

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहितीस्तव अग्रेषित

१. मा. मंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
२.मा. राज्यमंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
३. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, संचालनालय, म.रा., पुणे.
४. सर्व प्रादेशिक उप आयुक्त, समाज कल्याण विभाग
५. सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण
६. निवड नस्ती, विजाभज-२